# महाराष्ट्रात कोव्हिड -१९ साथीच्या दरम्यान रुग्णालयात काम करताना नर्सेसना आलेल्या आव्हानांचा अभ्यास



संशोधन अहवाल (संक्षिप्त)
नोव्हेंबर २०२०

---


श्वेता मराठे

दिपाली सुधिंद्र

स्वाती राणे

अभय शुक्ला


---


साथी प्रकाशन

SATHI
Support for Advocacy and Training to Health Initiatives

## प्रस्तावना

कोव्हिड-१९ साथीच्या काळात जगभरातील नर्सेस जोखीम स्वीकारून अविरतपणे सेवा देत आहेत. ‘जागतिक आरोग्य संस्थेने (डब्ल्यू.एच.ओ.)’ २०२० हे वर्ष ‘नर्सेसच्या सन्मानार्थ आंतरराष्ट्रीय वर्ष’ म्हणून घोषित केले आहे. भारतातही कोव्हिड-१९ साथीच्या काळात कार्यरत सर्व आरोग्य कर्मचाऱ्यांना ‘कोव्हिड योद्धा’ म्हणून गौरवण्यात येत आहे. अशा हजारो-लाखो कोव्हिड योद्ध्यांनी, कोव्हिड-१९ काळात अपुऱ्या मूलभूत सोयी-सुविधांसोबत स्वतःचा जीव धोक्यात घालून दिवसरात्र काम केले आहे. आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाने कोव्हिड काळात आरोग्य सेवा देताना सुरक्षेची साधने व त्यांचा वापर याबाबत मार्गदर्शक तत्त्वे प्रसारित केली आहेत. परंतु भारतभर जवळपास सर्वच आरोग्य सेवकांना साथीच्या काळात अपुऱ्या संसाधनांसोबत काम करावे लागले आहे. परिणामी अनेकांना कोव्हिडची लागण झाली. यासंदर्भात एकूण आकडा सध्यातरी एकत्रित कुठेही उपलब्ध नाही. एप्रिल २० मध्ये मुंबईतील वोक्हार्ट रुग्णालयामधील ५२ कर्मचाऱ्यांना एकाच वेळेस कोव्हिडची लागण झाली होती. तर जूनच्या सुरुवातीला दिल्लीतील ‘ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस (एम्स)’ या मोठ्या रुग्णालयात ४८० आरोग्य कर्मचाऱ्यांना कोव्हिडची लागण झाल्याचे दिसून आले. वित्त मंत्रालयाने सरकारी सेवेत असणाऱ्या आरोग्य कर्मचाऱ्यांसाठी आरोग्य विमा योजना जाहीर केली. या विमा योजनेत आरोग्य कर्मचाऱ्याचा मृत्यू झाला तरच हा लाभ मिळण्याची तरतूद आहे. तसेच खासगी आरोग्य सेवेतील आरोग्य कर्मचाऱ्यांचा या योजनेत समावेश नाही.

नर्सेसना येणाऱ्या अनेक अडचणींबाबत आवाज उठवण्यासाठी तसेच त्यांचे प्रश्न मांडण्यासाठी गेल्या काही महिन्यात देशभरात विविध ठिकाणी सरकारी व खासगी सेवेतील नर्सेसनी संप केले, आंदोलने केली. परंतु यासंदर्भात रुग्णालय प्रशासनाकडून नर्सेसच्या प्रश्नांची सकारात्मक दखल घेतल्याच्या बातम्या नाहीत. उलट, काही रुग्णालयांनी नर्सेसच्या समस्या आपल्या ठिकाणी नाहीतच असा पवित्रा घेतला. ‘आरोग्य व कुटुंब विभागा’नेही याची फारशी दखल घेतलेली दिसली नाही.

आरोग्य सेवेत नर्सेस हा डॉक्टरांच्या तुलनेने दुर्लक्षित असलेला घटक, कोव्हिडच्या काळात अनेक प्रकारच्या अडचणी आणि उपेक्षेला तोंड देत रुग्ण सेवा करीत आहे. मनुष्यबळ व संसाधनांच्या बाबतीतील सरकारी आरोग्य व्यवस्थेचे दुबळेपण आज कोव्हिडच्या काळात प्रकर्षाने जाणवत आहे. आणि अशा परिस्थितीत, रुग्णालयांमध्ये काम करणे इतर आरोग्य कर्मचाऱ्यांसोबतच नर्सेससाठीही कसोटीचे ठरते आहे. या पार्श्वभूमीवर सरकारी तसेच खासगी रुग्णालयात कोव्हिडच्या काळात काम करताना कामाच्या ठिकाणी मूलभूत नियमांचे पालन, किमान आवश्यक सुविधा, सुरक्षेच्या साधनांची उपलब्धता, रुग्णालयाने पुरवलेल्या कोव्हिडसंबंधी सोयी-सुविधा, यासंदर्भात नर्सेसना आलेली आव्हाने, त्यांनी केलेल्या मागण्या, आणि आंदोलनात सहभागी झाल्यामुळे त्यांच्यावर रुग्णांलयाकडून झालेले परिणाम याबाबतची परिस्थिती समजून घेण्यासाठी 'साथी' संस्थेमधून एक अभ्यास केला गेला.

## अभ्यासाची कार्यपद्धती

या अभ्यासात महाराष्ट्रातील शहरी व ग्रामीण भागातील, सरकारी व खासगी रुग्णालयामध्ये कोव्हिड काळात काम करणाऱ्या नर्सेसचे सर्व्हेक्षण ऑनलाईन पद्धतीने केले. एकूण ३६७ नर्सेसनी या सर्व्हेक्षणात सहभाग घेतला. त्याचबरोबर नर्सेस फेडरेशन, युनायटेड नर्सेस असोसिएशन (यु.एन.ए.), नर्सेसना नियुक्त करणारे सरकारी अधिकारी, सरकारी व खासगी रुग्णालयांमधील अधिकारी यांसारख्या एकूण पाच जणांच्या सविस्तर मुलाखती घेतल्या गेल्या. सदर अभ्यासासाठी ‘अनुसंधान ट्रस्ट’च्या ‘एथिक्स कमिटी’कडून मान्यता घेतली आहे.

## अभ्यासातील विश्लेषणातून पुढे आलेले मुद्दे...


### सर्व्हेक्षणात निवड झालेल्या मुलाखतदारांची माहिती

- या सर्व्हेक्षणात सहभाग घेतलेल्या ३६७ मुलाखतदारांपैकी ८८% (३२३) महिला होत्या. साधारण ५०% नर्सेस ३०-४५ या वयोगटातील असून सरासरी वय ३७ होते. २३.६% (९८) नर्सेसनी त्यांना मधुमेह, उच्च रक्तदाब, अस्थमा यांसारखा जीवनशैलीशी निगडित आजार असल्याचे सांगितले. तर २.७% (१०) नर्सेस या गरोदर वा स्तनदा स्त्रिया होत्या.
- सर्व्हेक्षणात महाराष्ट्रातील ग्रामीण भागातून ४७.१% तर शहरी भागातून तसेच शहरांमधून ५२.९% नर्सेसनी सहभाग घेतला. यामध्ये सरकारी रुग्णालयांमध्ये काम करणाऱ्या ७७% (२८१) आणि २३% खासगी रुग्णालयांमधील नर्सेस होत्या.
- जवळपास निम्म्या नर्सेसना (१८७) १० वर्षांपेक्षा जास्त कामाचा अनुभव असून त्यापैकी १२० नर्सेस या ज्येष्ठ नर्स, मुख्य नर्स, विभाग प्रमुख अशा पदांवर काम करत होत्या. १०८ नर्सेस मध्यम पातळीवर काम करत असून १०६ नर्सेस या कनिष्ठ पातळीवर तर ३३ नर्सेस ए.एन.एम. पदावर काम करत होत्या. एकूण नर्सेसच्या संख्येपैकी ६२% कायमस्वरूपी आणि ३८% कंत्राटी पदावर कार्यरत होत्या. अभ्यासातील एकूण नर्सेसपैकी, ३६% नर्सेस केवळ कोव्हिड विभागात काम करत होत्या तर ८३. ६% नर्सेस कोव्हिड विभागासोबत इतर विभागातही काम करत होत्या.

## कोव्हिडच्या काळात काम करताना नर्सेसना आलेली आव्हाने

कोव्हिडच्या काळात खासगी व सरकारी रुग्णालयांमध्ये काम करत असताना नर्सेसना विविध प्रकारची आव्हाने समोर आली. एकूण नर्सेसपैकी सर्वात जास्त म्हणजे ७६% (२७९ प्रतिसाद) नर्सेसनी कोविड दरम्यान जास्तीचे काम करावे लागले असे सांगितले. त्या खालोखाल ६५% (२३९ प्रतिसाद) नर्सेसनी या काळात गरजेच्या वेळी रजा मंजूर होत नव्हती, १७% (६४ प्रतिसाद) नर्सेसनी सलग दोन शिफ्ट ड्यूटी कराव्या लागल्या आणि ३९% (१४३ प्रतिसाद) नर्सेसनी कामाच्या वेळात वाढ झाल्याचे सांगितले. निम्म्यापेक्षा जास्त म्हणजेच ५६% (२०५ प्रतिसाद) नर्सेसनी सुरक्षा साधने पुरेशी उपलब्ध नसल्याचे सांगितले. तर २०% (७६ प्रतिसाद) नर्सेसनी पगारात कपात झाल्याचे आणि २३% (८४ प्रतिसाद) नर्सेसनी व्यवस्थापनाकडून दबाव आल्याचे सांगितले.


**तक्ता १: कोविडकाळात काम करताना नर्सेसना आलेली आव्हाने**



## कोव्हिड दरम्यान जास्तीचे काम

एकूण नर्सेसपैकी ६४% (२३५) नर्सेस दररोज ६ ते १० तास काम करत होत्या. २९% (१०५) नर्सेस दररोज १० तासांपेक्षा जास्त वेळ काम करत होत्या. ५७% नर्सेसना दररोज सरासरी १२ रुग्ण बघावे लागत होते तर ३१% नर्सेसना दररोज सरासरी २० रुग्णांकडे बघावे लागत असल्याचे सांगितले. सरकारी व खासगी रुग्णालयांमध्ये काम करणाऱ्या नर्सेसची तुलना करता, सरकारी रुग्णालयांमध्ये काम करणाऱ्या ३८% नर्सेस व खासगी रुग्णालयातील १०.५% त्यांच्या दररोजच्या शिफ्टमध्ये २० पेक्षा जास्त रुग्णांना बघत होत्या.

**तक्ता 2: कोव्हिड साथीदरम्यान दर शिफ्टमध्ये नर्स ते रुग्ण गुणोत्तर**




खासगी रुग्णालयामध्ये काम करणाऱ्या एका नर्सने सांगितले, *"खासगी रुग्णालयामध्ये कामाचा ताण खूप जास्त प्रमाणात आहे, कारण अशा रुग्णालयांमध्ये स्पेशल/डिलक्स/सिंगल रूम्समध्ये रुग्ण दाखल केले जातात. अशा रुग्णांना आम्हाला खूपच तत्परतेने लक्ष द्यावे लागते. त्यांनी बेल वाजवल्यावर धावत जाणे, आणि वेळ न दवडता तातडीने लक्ष द्यावे लागते. त्यामुळे रुग्णसंख्या जास्त असताना नर्सेससाठी हे खूपच कठीण जाते.''*

नर्सेस कौन्सिलने सुचविल्याप्रमाणे साधारण विभागात नर्स ते रुग्ण हे प्रमाण १:३ पेक्षा जास्त असू नये तर अतिदक्षता किंवा शल्य विभागात नर्स ते रुग्ण हे प्रमाण १:१ पेक्षा जास्त असू नये. परंतु प्रत्यक्षात परिस्थिती फारच वेगळी असल्याचे दिसून येते. मोठ्या शहरातील महानगरपालिकेच्या रुग्णालयांमध्ये काम करणाऱ्या काही नर्सेसना एका शिफ्टमध्ये तब्बल १५० पर्यंत सुद्धा रुग्ण बघावे लागत असल्याचे सांगितले. तर काही नर्सेसनी त्यांना प्रत्येक शिफ्टमध्ये ४०-८० रुग्णांकडे बघावे लागत असल्याचे सांगितले. अशा रुग्णालयांमध्ये कितीही बेड्स असले तरी प्रत्येक विभागात साधारणतः दोनच नर्सेस असतात. त्यामुळे त्या त्या विभागात भरती झालेल्या सर्व रुग्णांची जबाबदारी दोन नर्सेसवर पडते असेही सांगण्यात आले.

याउलट, काही छोटी खासगी रुग्णालये जी टाळेबंदीच्या सुरुवातीला म्हणजे मार्च २०२० मध्येच बंद ठेवण्यात आली होती, तेथे काम करणाऱ्या नर्सेसनी (१४) त्यांना एक दिवसाआड काम करण्यास अथवा सक्तीची रजा घेण्यास भाग पाडले गेले असे सांगितले. यु.एन.ए.च्या एका प्रतिनिधीने सांगितल्याप्रमाणे, *"सुरुवातीच्या काळात सरकारने कोव्हिड रुग्णांवर उपचार करण्यासाठी आवश्यक साधनसामग्रीच्या अभावामुळे छोट्या व मध्यम खासगी रुग्णालयांना परवानगी दिलेली नव्हती. इतर आजारांसाठीही अशा रुग्णालयांमध्ये दाखल होणाऱ्या रुग्णांचे प्रमाण घटले होते. त्यामुळे अशी रुग्णालये चालवण्याचा मोठा प्रश्न उभा राहिल्याने* ***नर्सेसना सक्तीच्या रजेवर पाठवणे, एक दिवसाआड काम, अर्धा दिवस काम असे उपाय अवलंबून रुग्णालयांनी त्यांच्या वेतनात कपात केली."***

सरकारी रुग्णालयांमध्ये काम करणाऱ्या २८% नर्सेसनी, मुख्यत्त्वे करून उपकेंद्रात काम करणाऱ्या नर्सेसनी कोव्हिड काळात त्यांच्या उपकेंद्रात रुग्ण दाखल होत नसल्याने काम नसल्याचे सांगितले. परंतु, या काळात या नर्सेसना जवळच्या सरकारी कोव्हिड केंद्रात ड्यूटी दिली तसेच काहींना घराघरांमध्ये जाऊन सर्व्हेक्षण करण्याची जबाबदारी दिली. प्राथमिक आरोग्य केंद्रात काम करणाऱ्या एका नर्सने *"आम्हाला रविवारी सुद्धा काम करावे लागत होते. कोव्हिड केंद्रांत १२-१२ तासांची ड्यूटी करावी लागत होती"* असे सांगितले. ग्रामीण भागात रिक्त पदांचा मुद्दा गंभीर असल्याने सेवेत रुजू असलेल्या नर्सेसवर अतिरिक्त ड्युटीचा भार कोव्हिड काळात प्रामुख्याने पडलेला दिसून आला.

मोठ्या शहरातील सरकारी रुग्णालयांमध्ये मात्र पदभरतीबाबत ग्रामीण भागापेक्षा बरी परिस्थिती असल्याचे दिसून आले. मोठ्या शहरांमधील सरकारी रुग्णालयांमधील रिक्त पदांचा मुद्दा कोव्हिडच्या सुरुवातीच्या काळात ऐरणीवर येऊन थोडीतरी पदभरती झाली. मार्च-एप्रिल २०२० या काळात मुंबई महानगरपालिकेने ३०० ते ३५० नर्सेसची कंत्राटी तत्त्वावर रिक्त पदे भरून काही कोव्हिड केंद्रांमध्ये हा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला.

## गरजेच्या वेळी रजा मंजूर होणे

जवळपास दोन तृतीयांश म्हणजेच ६५% (२३५) नर्सेसनी त्यांना गरजेच्या वेळेस रजा मंजूर झाली नसल्याचे सांगितले. बऱ्याच नर्सेसनी कोव्हिड काळात सलग बरेच महिने रजा मिळाली नसल्याचेही सांगितले. शासनाकडून अतिशय गरजेची परिस्थिती ओढवल्याशिवाय रजा मंजूर करायची नाही अशा सूचना होत्या. कोणत्याही नर्सला कोव्हिडची लागण झाली असल्यास तत्काळ रजा मंजूर करावी आणि या रजा त्यांच्या वार्षिक रजांमधून वजा केल्या जाऊ नयेत असे सरकारी आदेश काढले गेले होते. परंतु याचे पालन केवळ सरकारी रुग्णालयांमधूनच होत असल्याचे दिसले. खासगी रुग्णालयांमधून अशा अतिरिक्त रजा मंजूर केल्या गेल्या नसल्याचे दिसून आले.

## नर्सेसच्या पगारात कपात

अक्षरशः निम्म्या (४७%) नर्सेसनी कोव्हिड काळात पगारात कपात झाल्याचे सांगितले. यामध्ये सरकारी उपकेंद्रातील, प्राथमिक आरोग्य केंद्र व ग्रामीण रुग्णालयातील नर्सेसचा प्रामुख्याने समावेश होता असे दिसून आले. परंतु, नुकतेच सप्टेंबर २०२० मध्ये कपात केलेले पगार त्यांना परत देण्यास सुरुवात केल्याचेही ग्रामीण भागातील काही नर्सेसनी सांगितले. सरकारी रुग्णालयांपैकी राज्यस्तरीय सरकारी रुग्णालये व नगरपालिकेच्या रुग्णालयांमधील बहुतांश नर्सेसनी पगार उशिरा मिळत असल्याचे असे सांगितले. नर्सेस फेडरेशनच्या प्रतिनिधींच्या सांगण्याप्रमाणे, **कंत्राटी नर्सेसचे पगार तर तब्बल ४-5 महिने उशिरा होत होते'.**

विविध खासगी रुग्णालयांमधील बऱ्याच नर्सेसनी सुद्धा पगार कपात अनुभवली. वर सांगितल्याप्रमाणे छोट्या रुग्णालयांमधील नर्सेसना सक्तीच्या रजेवर पाठवण्यापासून, एक दिवसाआड काम करून ५०% पगार मिळण्यापर्यंत विविध अनुभव नर्सेसनी सांगितले. कॉर्पोरेट रुग्णालयांमध्ये नवीन रुजू झालेल्या नर्सेसना २ महिन्यांची सक्तीची रजा देऊन ५०% पगार दिला गेला. याबद्दल बोलताना मोठ्या खासगी धर्मादाय रुग्णालयातील एका नर्स म्हणाल्या, *"नर्सेसना पगार एकतर खूप उशिरा दिला आणि रुग्णालय व्यवस्थापनाने यावर्षी रुग्णालये तोट्यात असल्याचे वार्षिक पगारवाढ होणार नसल्याचे सांगितले. आधीच पगार अतिशय कमी (महिन्याला १० ते १२ हजार), त्यात वर्षभर पगारवाढ नाही यामुळे कायमस्वरूपी असलेल्या १००-१२५ ज्युनिअर नर्सेसनी आपल्या नोकऱ्या सोडल्या आणि ३५ ते ४० हजार पगार असलेल्या राज्य सरकारच्या रुग्णालयांमध्ये कंत्राटी तत्त्वावर कामाला रुजू झाल्या. रुग्णालयातील उर्वरित नर्सेसवरील ताण कमी करण्यासाठी व्यवस्थापनाने राजस्थानमधून ज्युनिअर नर्सेसना कंत्राटी तत्त्वावर, रुग्णालयातील इतर वरिष्ठ नर्सेसना मिळणाऱ्या पगाराच्या दुप्पट म्हणजेच ४० ते ५० हजार पगार देऊन रुजू करून घेतले."*

ह्या सर्व प्रकारातून खासगी रुग्णालयांमधील कर्मचाऱ्यांबाबत मनमानी धोरण आणि कमी पगार देऊन नर्सेसची होत असलेली पिळवणूक स्पष्टपणे समोर येते.

### नर्सेससाठी सुरक्षेच्या संसाधनांची उपलब्धता

निम्म्यापेक्षा अधिक (६१%) सरकारी रुग्णालयातील व ३६% खासगी रुग्णालयातील नर्सेसनी कोव्हिड काळात काम करत असताना पुरेशी सुरक्षा संसाधने मिळत नसल्याचे सांगितले. नंतरच्या काळात जरी परिस्थितीत सुधारणा दिसून आली, तरी वैयक्तिक संरक्षणात्मक उपकरणे (पीपीई कीट) व इतर आवश्यक संसाधनांचा दर्जा मात्र चांगला नसल्याची तक्रार अनेक नर्सेसनी केली. यु.एन.ए.च्या एका प्रतिनिधीने सांगितल्याप्रमाणे, *"खासगी रुग्णालयांमधील नर्सेस ८ तास एकच पीपीई कीट घालून ड्यूटी करत होत्या. त्यांना जरी पीपीई कीट खराब झाले, फाटले किंवा खूप वेळ वापरले गेले तरी एका दिवसात परत मिळण्याची सोयच नव्हती."*

नर्सेसना 'कोव्हिड योद्धा' म्हणून गौरवले गेले परंतु त्या प्रमाणात आवश्यक सुरक्षा संसाधने मिळण्याबाबत मत व्यक्त करताना नगरपालिकेतील एका नर्स युनियनच्या एक प्रतिनिधी म्हणाले, *"मुंबईतील विविध रुग्णालयांमधील काम करत असलेल्या कोव्हिड योद्ध्यांवर विमानातून फुलांचा वर्षाव करण्यासाठी पैसे खर्च करण्यापेक्षा सरकारने याच योद्ध्यांसाठी पुरेशी सुरक्षा संसाधने पुरवण्याकडे लक्ष द्यायला हवे. किमान सुविधांची कमतरता असताना आणि जनता व आरोग्य कर्मचारी महामारीच्या मोठ्या संकटातून जात असताना अशा दिखाऊ कृतींना प्रत्यक्षात काहीच अर्थ उरत नाही."*

## कोव्हिडची लागण झालेल्या नर्सेससाठी रुग्णालयातून सोयी-सुविधा

- **कोव्हिड भत्ता**

  केवळ २१% खासगीतील व ७.५% सरकारी रुग्णालयांमधील नर्सेसनी कोव्हिड काळात अतिरिक्त भत्ता मिळाल्याचे सांगितले. त्यातही सरकारी रुग्णालयांमधील कंत्राटी कर्मचाऱ्यांना कोव्हिड भत्ता मिळालाच नाही. उपकेंद्र / प्राथमिक आरोग्य केंद्र / ग्रामीण / उपजिल्हा व जिल्हा याचबरोबर राज्य सरकार संचालित सरकारी मेडिकल कॉलेजशी निगडित रुग्णालयांमधील कर्मचाऱ्यांना कोव्हिड काळात कोणताही अतिरिक्त भत्ता मिळाला नाही. परंतु महानगरपालिकेच्या नर्सेसना नियमित रु. ३०० प्रति दिन भत्ता मिळत होता. काही खासगी रुग्णालयांनी दरमहा २०००-३००० रुपये तर काहींनी २०० रुपये प्रती कामाचा दिवस असा भत्ता देऊ केला जो नगरपालिकेने कायमस्वरूपी नर्सेसना दिलेल्या भत्त्यापेक्षा बराच कमी होता.

- **कोव्हिड चाचणीची सुविधा**

  ८६.५% सरकारी व ५६% खासगी रुग्णालयातील नर्सेसनी कोव्हिडची लक्षणे जाणवल्यास त्या काम करत असलेल्या रुग्णालयामध्ये कोव्हिड चाचणी करून घेण्याची सुविधा दिल्याचे सांगितले. काही खासगी रुग्णालयातील नर्सेसना अशी लक्षणे आढळल्यावर रुग्णालयात कोव्हिड चाचणी केली असता, महिना अखेरीस त्यांच्या पगारातून पैसे कापून घेतले गेल्याचे सांगितले.

- **विलगीकरणाची सुविधा**

  सरकारी व खासगी रुग्णालयांमधील नर्सेसनी कोव्हिड काळात विलगीकरणाच्या सुविधेची मागणी केली. या मागणीनुसार शहरी भागातील बऱ्याच सरकारी रुग्णालयांनी काही हॉटेल्स, लॉज, वसतिगृह, कार्यालये अशा ठिकाणी नर्सेसच्या राहण्यासाठी व्यवस्था करून दिली. याबाबत नगरपालिकेतील एका नर्स युनियनच्या प्रतिनिधी सांगताना म्हणाल्या,

*"रुग्णालयांकडून विलगीकरणाची सोय मिळवण्यासाठी आम्हाला खूप लढावे लागले. विविध पातळ्यांवरील व्यवस्थापनासोबत सातत्याने केलेल्या प्रयत्नांतून काही रुग्णालयांनी विलगीकरणासाठी सुविधा पुरवली. हे सर्व रुग्णालयाच्या प्रशासकीय यंत्रणेवर अवलंबून होते. आम्हाला याबाबत बऱ्याच प्रमाणात भेदभावाचे अनुभव आले. जसे की, डॉक्टरांची सोय हॉटेल्समध्ये तर नर्सेसची वसतिगृह किंवा मंगल कार्यालयांमध्ये केली गेली."*

दुसऱ्या बाजूला, खासगी रुग्णालयांमधील नर्सेसनी त्यांच्यासाठी अशा कोणत्याही प्रकारच्या सोयी केल्या गेल्या नाहीत असे सांगितले, उलट, जर त्यांना कोव्हिडची लक्षणे आढळली तर स्वतःच्या घरीच विलगीकरणात राहण्यास सांगितले गेले.

- **उपचाराची सुविधा व उपचारांचा खर्च**

७३% सरकारी व ६३% खासगी रुग्णालयांमधील नर्सेसनी त्यांना त्या काम करत असलेल्या रुग्णालयातून उपचाराची सुविधा मिळाल्याचे सांगितले. बऱ्याच रुग्णालयांमध्ये कोव्हिडची लागण झालेल्या नर्सेसना त्यांच्याच रुग्णालयांमध्ये दाखल करून घेण्यासाठी झगडावे लागले. काही रुग्णालयांनी अशा प्रयत्नानंतर उशिरा का होईना नर्सेससाठी सुविधा उपलब्ध करून दिली. काही नगरपालिकेच्या रुग्णालयांमध्ये नर्सेससाठी स्वतंत्र विभागाची सोय उशिरा का होईना करण्यात आली.


९०% सरकारी तर ६०% खासगी रुग्णालयांमधील नर्सेसनी कोव्हिडचे उपचार रुग्णालयातून मोफत मिळाल्याचे सांगितले. बहुतांशी खासगी नर्सेसना कर्मचाऱ्यांच्या १ लाख रुपयांच्या विमा योजनेतून मोफत उपचार दिले जात असल्याचे सांगितले गेले.

## नर्सेसच्या मागण्या व त्यावर प्रशासनाचा प्रतिसाद

### नर्सेसच्या मागण्या कोणाकडे व कशा संदर्भात केल्या गेल्या?

एकूण नर्सेसपैकी ७१% (२६१ प्रतिसाद) नर्सेस रुग्णालयातील संबंधित अधिकाऱ्यांना भेटल्या. ३८% (१४० प्रतिसाद) नर्सेसनी आपल्या मागण्या रुग्णालय व्यवस्थापनाकडे लिखित स्वरूपात दिल्या. ३१% (११६ प्रतिसाद) नर्सेस मागण्या पूर्ण करण्यासाठी संपात सहभागी झाल्या. या मागण्यांमध्ये कामकाजाचे तास व कामाचा ताण कमी करणे ५२% (१९१ प्रतिसाद), कंत्राटी कर्मचाऱ्यांची कायमस्वरूपी नियुक्ती ५०.४% (१८५ प्रतिसाद), गरजेच्या वेळेस रजा मंजूर व्हावी ४४% (१६० प्रतिसाद), पुरेशा सुरक्षा संसाधनांचा पुरवठा ६% (२१), पूर्ण पगार मिळावा २४.५% (९० प्रतिसाद) आणि पगारात वाढ ३४% (१२४ प्रतिसाद) अशा मागण्या प्रामुख्याने केल्याचे दिसून आले.

**तक्ता 3: नर्सेसनी केलेल्या प्रमुख मागण्या**



### रुग्णालय प्रशासनाकडून दबाव

१९% सरकारी रुग्णालयांमधील नर्सेसनी तर खासगी रुग्णालयातील तब्बल अर्ध्यापेक्षा जास्त (५७%) नर्सेसनी मागण्या केल्यानंतर संबंधित रुग्णालय व्यवस्थापनाकडून त्यांच्यावर दबाव आल्याचे सांगितले.

एकूण नर्सेसपैकी १०% सरकारी तर २०% खासगी नर्सेसनी कोणत्याही प्रकारच्या मागण्या केल्या नाहीत असे दिसून आले. काही खासगी रुग्णालयातील नर्सेसनी मागण्या केल्यावर होणाऱ्या परिणामांची भीती वाटते असे सांगितले. तर काहींनी मुख्य नर्स किंवा मेट्रन आमच्यावर यासंदर्भात सतत लक्ष ठेवून असतात असे सांगितले. नर्सेसच्या बाबतीत कोणत्याही प्रकारची माहिती रुग्णालयाबाहेरील कोणालाही कळता कामा नये अशी सक्त ताकीद काही खासगी रुग्णालयांमधील नर्सेसना देण्यात आल्याचे सांगितले. खासगी रुग्णालयातील एका नर्सने *"सर्व्हेक्षणात आमचे अथवा रुग्णालयाचे नाव जर बाहेर आले, आणि आम्ही मुलाखत दिली आहे असे कळले तर रुग्णालयाकडून आमच्यावर थेट कारवाई होऊ शकते व आमची नोकरीही धोक्यात येऊ शकते"* असे मुलाखतीसाठी संमती देताना सांगितले.

यु.एन.ए.च्या एक प्रतिनिधी म्हणाल्या, *"एका कॉर्पोरेट रुग्णालयातील नर्सेस वेळेवर पगार न मिळणे, विलगीकरणाच्या सुविधेचा अभाव, अपुरी पीपीई संसाधने अशा मूलभूत समस्यांना तोंड देत होत्या. सुरुवातीला नर्सेसनी ज्या मागण्या मांडल्या त्याकडे रुग्णालय प्रशासनाने पूर्ण दुर्लक्ष केले. या साध्या साध्या मागण्या मान्य करण्याऐवजी प्रशासनाने काही नर्सेसना अनुभवाचे प्रमाणपत्र दिले जाणार नाही, पगार दिला जाणार नाही असे सांगून दबाव टाकला, तर काहींना नर्सेस राहत असलेल्या वसतिगृहात गुंड पाठवून धमकावले. असे अन्यायकारक प्रकार एकाच नाही तर कितीतरी मोठ्या खासगी रुग्णालयांमध्ये होत असतात"*.

### नर्सेस युनियन्सची भूमिका

सर्व्हेक्षणातील बहुतांश नर्सेसनी विलगीकरणाची सुविधा, नर्सेससाठी स्वतंत्र कोव्हिड कक्ष, कोव्हिड भत्ता या आणि अशा अनेक निर्णयांबाबत नर्सेस युनियन्सची अत्यंत सकारात्मक भूमिका असल्याचे सांगितले आहे.

लॉकडाऊनच्या सुरुवातीच्या काळात युनियनच्या प्रतिनिधींना यशस्वीपणे हस्तक्षेप करण्यात फारसे यश मिळाले नाही. बऱ्याच रुग्णालयांमध्ये नर्सेस आणि मेट्रननी केलेल्या मागण्यांची प्रशासनाने अजिबात दखल घेतली नव्हती, परंतु नर्सेस युनियनच्या प्रतिनिधींनी दिलेल्या सक्रिय पाठिंब्याने काही रुग्णालयांमधील नर्सेसच्या काही मागण्या तरी पूर्ण होण्यास पद्धतशीर मदत झाली.

### अभ्यासातील मर्यादा

या अभ्यासात समाविष्ट नर्सेसचे प्रमाण महाराष्ट्रातील एकूण नर्सेसच्या प्रमाणात फारच थोडके असल्यामुळे सदर अभ्यासातील विश्लेषणातून पुढे आलेल्या मुद्द्यांचे सामान्यीकरण करणे योग्य ठरणार नाही परंतु हा अभ्यास कोव्हिड काळात नर्सेसच्या समोर असलेल्या आव्हानांची व्याप्ती समोर आणण्यात नक्कीच महत्त्वाचा आहे. दुसरे म्हणजे, खासगी रुग्णालयांमध्ये काम करत असलेल्या नर्सेसचे सर्व्हेक्षणातील प्रमाण फक्त एक पंचमांश (२३.४%, n=८६) एवढेच आहे. वर उल्लेख केल्याप्रमाणे नर्सेस व रुग्णालयातील माहिती बाहेर कळू न देण्याबाबत प्रशासकीय दबाव व नोकरी गमावण्याची भीतीही कारणे प्रामुख्याने दिसून येतात.

## निष्कर्ष

सदर अभ्यासात सर्व्हेक्षणासोबतच काही सविस्तर मुलाखतीही घेतल्या, ज्यामधून कोव्हिड साथीच्या काळात नर्सेस तोंड देत असलेली आव्हाने आणि अनुभव पुढे येण्यास मदत झाली. जरी हा अभ्यास महाराष्ट्रापुरता मर्यादित होता, तरी सरकारी व खासगी क्षेत्रातून समोर आलेली आव्हाने व अडचणी सर्वव्यापी असून भारतातील इतर राज्यांमध्येही कमी जास्त प्रमाणात अशाच प्रकारच्या अडचणी असल्याचे इतर अहवाल व बातम्यांमधून लक्षात येते.

जास्त काम, अपुऱ्या पीपीई किट्सचा पुरवठा, उशिरा पगार, कोविड भत्ता न मिळणे, यासारखे मुद्दे सरकारी आणि खाजगी दोन्ही रुग्णालयातील नर्सेसच्या बाबतीत असले तरी या अभ्यासातून नर्सेसना काम करत असताना येणारे व्यवस्थानाचा दबाव, नर्सेसना मिळणाऱ्या सोई-सुविधा आणि साथीच्या काळात सरकारी व खासगी आरोग्य व्यवस्थांमध्ये नर्सेसप्रती असलेली लक्षणीय तफावत याचे चित्र उभे राहते ज्याचा संबंध बऱ्यापैकी सरकारी आणि खासगी आरोग्य क्षेत्राच्या धोरणांशी आहे.

सरकारी आरोग्य व्यवस्थेत काम करणाऱ्या नर्सेस खूप जास्त काम, अपुरी संसाधने, अपुऱ्या पीपीई किट्सचा पुरवठा, उशिरा पगार, अशा आव्हानांना सामोरे जाताना दिसून आल्या तरीही सरकारी रुग्णालयांमध्ये कोव्हिडच्या विशेष रजा, मोफत तपासण्या, विलगीकरणाची सुविधा व उपचारांबाबत तुलनेने बरी परिस्थिती दिसून आली. त्यातही उशिरा पगार, कोव्हिड भत्ता न येणे अशा समस्या सरकारी कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या बाबत प्रकर्षाने दिसून आल्या. ग्रामीण भागातील सरकारी नर्सेससमोर मात्र कामाचा ताण आणि मूलभूत संसाधनांचा अभाव असे दुहेरी आव्हान असल्याचे दिसते तसेच त्यांच्या मागण्या दुर्लक्षित राहिल्याचे दिसते.

दुसऱ्या बाजूला खासगी रुग्णालयात, कमी अधिक प्रमाणात वरील समस्यांसोबतच खासगी आरोग्य क्षेत्रातील नर्सेस विलगीकरणाची सुविधा, कोव्हिडची लागण झालेल्या नर्सेससाठी स्वतंत्र विभाग याचा अभाव व एकूणच कर्मचारी म्हणून सोयी-सुविधा मिळण्याबाबत परिस्थिती सरकारी रुग्णालयाच्या तुलनेत फारशी बरी नसल्याचे दिसते. नोकरीतील अनिश्चितता, कामाच्या ठिकाणी घातलेल्या अटी, त्याविरुद्ध आवाज उठवल्यास वारंवार कामावरून कमी करण्याच्या, पगार कापून घेण्याच्या धमक्यांना सामोरे जावे लागत असल्याचे दिसून आले. खासगी रुग्णालयातील नर्सेसवर रुग्णालय व्यवस्थापनाचा दबाव असल्याचे प्रकर्षाने जाणवते. मागण्या मान्य होण्याबाबतही सरकारी रुग्णालयाच्या तुलनेत खासगी रुग्णालयात फारसा प्रतिसाद मिळाल्याचे दिसत नाही. एकूणच या अभ्यासातून आरोग्य क्षेत्रात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे हक्क, रजा, पगार, कामाच्या ठिकाणी सुरक्षितता, यांबाबत विविध प्रकारांनी होत असणारे उल्लंघन होत असल्याचे समोर येते.

या संदर्भात आरोग्य व्यवस्थेत दोन पातळ्यांवर उपाययोजना करणे गरजेचे आहे. एक तर आवश्यक मूलभूत सोयी सुविधा, संरक्षणाची साधने, आणि कामाच्या ठिकाणी सुव्यवस्था, सुरक्षितता आवश्यक आहे त्याचबरोबर दुसरे म्हणजे आरोग्य सेवेत रिक्त पदे भरती व खासगी रुग्णालयावर शासनाचा अंकुश असणे गरजेचे आहे जेणेकरून आरोग्य कर्मचाऱ्यांसाठी कामाच्या ठिकाणी सुव्यवस्था, हक्कांचे संवर्धन होईल.

अभ्यासातून पुढे आलेल्या मुद्द्यांच्या संदर्भात आम्ही पुढील उपाययोजना सुचवत आहोत.

## अभ्यासातून पुढे आलेल्या महत्त्वाच्या उपाययोजना

1. **नर्सेसची मुख्य प्रशासकीय रिक्त पदे भरावीत** - सध्या काही राज्य संचालित रुग्णालयांमध्ये एकच मेट्रन पद भरलेले आहे. कोव्हिड काळात नर्सेसचे प्रश्न लक्षात घेता गंभीर मुद्द्यांवर मार्गदर्शन करण्याची प्रशासकीय क्षमता वाढविण्यासाठी रिक्त पदे भरणे आवश्यक आहे.

2. **नर्सेसची रिक्त पदे तातडीने भरावीत** - एकूण नर्स व रुग्णाचे गुणोत्तर व नर्सेसवरील कामाचा अतिरिक्त बोजा पाहता रिक्त पदे तातडीने भरण्याची आवश्यकता आहे. याव्यतिरिक्त बाहेरील राज्यांमधून नर्सेसची नियुक्ती करण्यापेक्षा राज्यांतर्गत नियुक्तीवर भर द्यावा. सरकारी आरोग्य यंत्रणेत असलेल्या रिक्त पदांची माहिती एकत्रित उपलब्ध केली गेली पाहिजे. जी या घडीला उपलब्ध नाही. पदभरती करताना नर्सेस युनियनचा सहभाग घ्यायला हवा. राज्य सरकारने कायमस्वरूपी नर्सेसची पदे नियुक्त करण्याचे धोरण अंमलात आणायला हवे.

3. **चांगल्या दर्जाची सुरक्षेची संसाधने पुरवावीत -** सरकारी व खासगी आरोग्य यंत्रणेतील व्यवस्थापनाने कोव्हिड साथीच्या काळात पुरेसा पुरवठा होईल याची काळजी घेतली पाहिजे. यासाठी आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, भारत सरकारच्या मार्गदर्शक सूचनांनुसार कर्मचाऱ्यांसाठी चांगल्या दर्जाची व पुरेशी पीपीई कीट्स पुरवली पाहिजेत.

4. **तसेच जीवनशैलीशी निगडित मधुमेह, रक्तदाब इ. आजार तसेच गरोदर वा स्तनदा नर्सेसना कोव्हिड विभागात ड्युटी देऊ नये.**

5. **कोव्हिड काळात कंत्राटी नियुक्त नर्सेसच्या कामकाजाच्या परिस्थितीत सुधारणा होणे आवश्यक आहे.** इतर नर्सेससोबतच कंत्राटी नर्सेसच्या आरोग्याची काळजी, कामाची जागा सुरक्षित असणे, योग्य व आवश्यक सुरक्षा संसाधनांचा पुरवठा याची पूर्ण जबाबदारी संबंधित रुग्णालयाची असायला हवी. याव्यतिरिक्त कोव्हिडसदृश लक्षणे आढळल्यास चाचणीची सोय, कोव्हिडची लागण झालेल्या नर्सेसना मोफत उपचारांची सोय, १४ दिवस विलगीकरणाची सुविधा 'भारतीय आयुर्विज्ञान अनुसंधान परिषदे'च्या मार्गदर्शक सूचनांनुसार पुरवणे आवश्यक आहे.

6. **कोव्हिड काळात सुसज्ज विलगीकरण कक्ष असावा ज्यामध्ये पुरेशी विलगीकरण व्यवस्था, स्वच्छता व उपचाराची सुविधा असावी.** ज्या नर्सेसना कोव्हिडसदृश लक्षणे आहेत, त्यांच्यासाठी १४ दिवस विलगीकरणाची सुविधा उपलब्ध असावी.

7. **नवीन नियुक्त झालेल्या नर्सेसना तातडीने प्रशिक्षण मिळावे.** नवीन नियुक्त झालेल्या नर्सेस व डॉक्टरांना आत्मविश्वासाने व भितीशिवाय काम करता येण्यासाठी व्यवस्थित प्रशिक्षण मिळणे आवश्यक आहे. ज्याचा परिणाम थेट रुग्णांवर होइल.

8. **नर्सिंग टास्क फोर्स त्वरित तयार करावा** ज्यामध्ये नगरपालिका, राज्य सरकार, नर्सिंग असोसिएशन, नर्सेस युनियन, इ. प्रतिनिधींचा समावेश असावा. जेणेकरून नर्सेससमोर येणाऱ्या आव्हानांचा सर्वांगीण विचार होऊन मार्ग काढता येईल.

9. **आरोग्य कर्मचाऱ्यांच्या हक्कांसाठी तक्रार निवारण यंत्रणा उभी करायला हवी.** तक्रार निवारण यंत्रणेत संबंधित आरोग्य पातळीवर मुद्दे सुटण्यासाठी कार्यकारी यंत्रणा उभी करणे आवश्यक आहे.

10. **नियमित पगार व जास्तीच्या कामाचा मोबदला वेळेवर मिळावा.** १७ जून २०२० च्या सुप्रीम कोर्टाच्या आदेशानुसार, जे रुग्णालय आरोग्य कर्मचाऱ्यांच्या वेतनास उशीर करेल त्यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करता येऊ शकतो. कोव्हिड अलगीकरण वा विलगीकरणादरम्यान नर्सेसना पूर्ण पगार मिळाला हवा. तसेच सर्वच नर्सेसना कायद्यानुसार अतिरिक्त कामाचा मोबदला मिळायला हवा.

11. **वित्त मंत्रालायाने आरोग्य कर्मचाऱ्यांसाठी विशेष विमा योजना जाहीर केली आहे, ही योजना फक्त सरकारी कर्मचाऱ्यांसाठी असून खासगी नर्सेसना या योजनेचा कोणताही फायदा नाही.** तसेच या योजनेअंतर्गत जीवितहानी झाल्यासच कुटुंबास मोबदला मिळण्याची सुविधा आहे. या योजनेत कोव्हिडची लागण झालेल्या नर्सेससाठी मोफत उपचारांची सोय नाही. परंतु ही विमा योजना सरकारी, खासगी अशा दोन्ही क्षेत्रातील आरोग्य कर्मचाऱ्यांसाठी असायला हवी आणि यात कोव्हिडची लागण झालेल्या नर्सेससाठी मोफत सेवा सुविधा, उपचारांचीदेखील सोय असायला हवी.

12. **नर्सेसना कोव्हिडसदृश लक्षणांची लागण दिसून आली तरीही काही नर्सेसना पगारी रजा न मिळाल्याचे या अभ्यासातून समोर आले आहे.** काही खासगी रुग्णालयांमधील नर्सेसनी विलगीकरणादरम्यान घेतलेल्या रजा त्यांच्या उपलब्ध रजांमधून कापण्यात आल्या. खासगी रुग्णालयांनी नर्सेसना कोव्हिड साठीची अतिरिक्त रजा द्यायला हवी, कोव्हिड सदृश लक्षणांमध्ये अथवा कोव्हिडची लागण झाली असता अशा नर्सेसना मोफत विलगीकरणाची सोय, पगार न कापता रजा, व मोफत उपचारांची सोय देण्यात यावी. हे सर्व कंत्राटी कर्मचाऱ्यांसाठी सुद्धा लागू करावे. रुग्णालय प्रशासनाने नर्सिंग कर्मचाऱ्यांसाठी योग्य कामाच्या वेळा व पोषक जेवण याकडे विशेष लक्ष द्यावे.

13. **समुपदेशनाची सुविधा व कामातून बाहेर पडण्याचा हक्क -** आरोग्य कर्मचारी साथीच्या काळात मानसिक तणावाखाली असतात. सरकारने नर्सेसच्या मानसिक आरोग्यासाठी समुपदेशनाची सुविधा/हेल्पलाईन सेवा उपलब्ध करून दिली पाहिजे. नर्सेसच्या कामकाजादरम्यान धोका जाणवल्यास त्यांना कामातून बाहेर पडण्याचा हक्क असावा व असे केल्यास त्याबद्दल त्यांच्यावर कोणताही दबाव व कारवाई होऊ नये यासाठी त्यांना संरक्षण मिळायला हवे.

14. **खासगी क्षेत्रावर शासनाचा अंकुश -** या अभ्यासातून खासगी आरोग्य क्षेत्रातील कामाच्या ठिकाणच्या परिस्थिती व्यवस्थापनाबद्दल बरेच महत्त्वाचे मुद्दे समोर आले. काही खासगी रुग्णालयात, रुग्णालय व्यवस्थापनाकडून असलेले दबाव याशिवाय नर्सेसना विलगीकरणासाठी पगारी रजा न देणे, त्यासाठी त्यांच्या रजा कापणे तसेच त्यांना सक्तीच्या रजेवर पाठवणे, पगारात कपात आणि उशिरा पगार मिळणे अशा विविध अडचणींना सामोरे जावे लागले. काही खासगी रुग्णालयांमध्ये काम करणाऱ्या नर्सेसना अत्यंत कमी पगार आहे. २०१६ च्या सुप्रीम कोर्टच्या निर्णयानुसार खासगी आरोग्य क्षेत्रातील सर्व आरोग्य कर्मचाऱ्यांचे पगार वाढवण्याचे आदेश दिले आहेत परंतु याची अंमलबजावणी कुठेच झालेली दिसत नाही. कोव्हिड १९ च्या काळात कोव्हिडचे उपचार देण्यात एकूणच खासगी रुग्णालयांचा मोठा सहभाग पाहता, शासनाने खासगी आरोग्य क्षेत्रात हस्तक्षेप करून सुप्रीम कोर्टाने दिलेल्या निर्णयाचे अनुपालन सुनिश्चित करणे गरजेचे आहे.

    एकूणच कोव्हिड साथीच्या काळात ऋणांच्या संदर्भातील अनेक गंभीर मुद्दे पाहता खासगी आरोग्य क्षेत्रावर नियंत्रण आणणे किती गरजेचे आहे हे अधोरेखित झाले आहेच. या संदर्भात केंद्रीय मंत्रालयाने २०१० साली मंजूर केलेल्या रुग्णालय आस्थापना कायद्याचा (क्लिनिकल एस्टॅब्लिशमेंट ॲक्ट-सी.ई.ए.) अवलंब महाराष्ट्र शासनाने लवकरात लवकर करणे आवश्यक आहे. सी.ई.ए.ची अंमलबजावणी योग्य प्रकारे झाल्यास खासगी रुग्णालयाच्या कामकाजावर नियंत्रण तर येईलच परंतु त्यामुळे नर्स ते रुग्ण गुणोत्तर याबाबत नियमांचे पालनही योग्य प्रकारे होण्यास मदत होईल.

15. **आरोग्य क्षेत्रातील कार्यबल वाढविण्यासाठी बजेटमध्ये तरतूद वाढविणे गरजेचे आहे.** रिक्त पदे भरणे, वेळेवर पगार होणे, आवश्यक सुरक्षा संसाधनांचा पुरवठा होणे, यासाठी बजेटमध्ये वाढ होणे नितांत गरजेचे आहे.

16. **केंद्र सरकारच्या सर्व समावेशक मार्गदर्शक सूचनांची आवश्यकता -** कोव्हिड-१९ साथीच्या पार्श्वभूमीवर सरकारी आणि खासगी आरोग्य क्षेत्रात आलेल्या आव्हानांना लक्षात घेऊन केंद्र सरकारने कायमस्वरूपी व कंत्राटी दोन्ही प्रकारच्या नर्सेससाठी रजा मिळणे, अतिरिक्त भत्ता, पूर्ण पगार मिळणे, सुरक्षा संसाधनांची उपलब्धता, नर्सेसची कायमस्वरूपी नियुक्ती, विमा योजनेत उपचारांचा समावेश व वर उल्लेख केलेले इतर मुद्दे लक्षात घेऊन सर्वसमावेशक मार्गदर्शक सूचना लवकरात लवकर बनविण्याची आवश्यकता आहे.

*सदर अभ्यासासाठी अनेकांचे सहकार्य लाभले. साथी संस्थेतील विविध व्यक्ती, अभ्यासासाठी संपर्क सुचविण्यासाठी ज्यांनी सहाय्य केले, तसेच अभ्यासात सहभागी झालेल्या सर्वच नर्सेसचे मनापासून आभार! या अभ्यासासाठी 'एफजीएचआर' या संस्थेचे अर्थसहाय्य मिळाले आहे.*

***सविस्तर अहवालासाठी पहा-*** https://sathicehat.org/reports-rsrch/